महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था MSACS

# जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण पथक, यवतमाळ

कार्यालयाचा पत्ता : जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, श्री.व.ना.शा.वै.महा. व रूग्णालय परीसर,यवतमाळ
☎ : ०७२३२- २३९५१५ email : dpoyavatmal@mahasacs.org

## DAPCU – Nutrition Support Unit for CABA

## संकल्पना

जगभर एच.आय.व्ही./एड्स या सर्वदूर पसरलेल्या आजारामुळे हजारो मुले अनाथ झाली आहेत. बालकांना आपल्या आई व वडील यापैकी एक किंवा बहुदा दोघांनाही एड्स या आजारामुळे गमवावे लागले. अशा बालकांचा सांभाळ त्याचेनातेवाईक करीत आहेत, ही बालके अनाथ, कुपोषित, निराधार होत आहेत.

एड्स संसर्गित/प्रभावित बालकांच्या बाबतीत अचूक माहिती उपलब्द नसल्याने असे दर्शवते कि बालक हि भारतातील एड्स जागरुकतेतील अतिशय दुर्लक्षित घटक आहे.

एच.आय.व्ही आणि एड्स मुळे बालकांचे जीवन उध्वस्त झाले असून त्यांचे बालपण त्यांच्यापासून हिरावून घेतले गेले आहे. भारतामध्ये, अति प्रभावशाली राज्य आणि जिल्ह्यातील ओ.व्ही.सी. हे खूप मोठ्या संख्येने अत्यंत दयनीय जीवन जगत आहेत, एच.आय.व्ही/एड्स चा अत्यंत प्रतिकूल परिणाम म्हणजे कलंक आणि भेदभाव, ज्यामुळे हि बालके त्यांच्या मुलभूत सेवापासून वंचित राहतात जेणेकरून आरोग्य आणि शिक्षण. आजारपण किंवा पालकांचा मृत्यू किंवा एकटेपणा हि त्यांना असुरक्षित बनवते खासकरून यामुळे त्यांची पिळवणूक होते व त्यांचा दुरुपयोग केला जातो.

यवतमाळजिल्हाएच.आय.व्ही./एड्स च्या बाबतीत अति जोखीम गटामध्ये मोडत आहे, यवतमाळ जिल्ह्यातील विविध प्रश्न/समस्या आणि बालकांची स्थितीलक्षात घेता **यवतमाळ जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक** आणि **OVC Social Protection Project,**Karnataka Health Promotion Trust (KHPT)याटीम नी एकत्रितयेऊन **DAPCU – Nutrition Support Unit for CABA**हे पथक स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

## उपक्रम :

एच.आय.व्हीसंसर्गित बालकांना नियमित सकस आहाराची, प्रथिनेयुक्त अन्नाची नितांत आवश्यकता असते. बालकांची ही गरज लक्षात घेता पथक सर्व प्रथम एच.आय.व्हीजीवन जगणा-या बालकांना सकस आहार उपलब्ध करून देण्या करीता उपक्रम राबविणार आहे."सुरुवात केल्या नंतरच लोक त्यात सहभाग नोंदवितात" हे वाक्य समोर ठेवून हा उपक्रमसुरु करण्याचे ठरविले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात एच.आय.व्ही/एड्स प्रतिबंध व नियंत्रण करीताकार्यरत विविध Facility, NGO च्या माध्यमातून हा उपक्रम राबविणार.ICTC and ART Centre च्या माध्यमातून गरजू बालकांची माहितीतयारकरण्यात येईल. Facility, NGO चे सदस्य दरमहा नगदी किंवा वस्तू स्वरूपता गोळा करतील आणि एकत्रित झालेला आहार ICTC and ART Centre च्या माध्यमातून दरमहा वितरीत केला जाईलआणि सकस आहाराची माहिती दिली जाईल.

Facility, NGO चे प्रतिनिधी या उपक्रमाला प्रसिद्धी आपल्या संपर्कातील लोकांना भेटून देतील, जास्तीतजास्त लोकांपर्यंत ही संकल्पना पोहचविणार आणि कुठलीही मदत ही फक्त वस्तू स्वरुपात घेणार.

## परीणाम :

एच.आय.व्हीसंसर्गित,अनाथ वअसुरक्षितबालकाना कुंटुंबातील आर्थिक अडचणीमुळे पूर्णसकसघेता येत नाही अशाबालकांना या उपक्रमाच्या माध्यमातूनसकस आहार उपलब्धकरूनदिल्या जाईल. बालकांना सकस आहार नियमित मिळाल्यास त्यांचाCD4 वाढेल, संधी सादु आजारहोणार नाही, रोग प्रतिकार शक्ती वाढेल.

## टीप :

Facility, NGO-ICTC Counsellors, Lab Technician, ART Centre staff, TI NGO, PPTCT NGO, VIHAAN NGO staff and Member
ART Centre: Anti Retro Viral Therapy Centre
ICTC : Integrated Counselling and Testing Centre.